**जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांच्या चतुर्थ श्रेणीतील शिपाई पदाच्या भरतीप्रक्रीयेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग**
**शासन पुरकपत्र क्र. जिमस.०४३६/प्र.क्र.५०/२-स**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : ०६ जुलै, २०२६

**संदर्भ**- (१) शासन निर्णय क्र. जिमस.०४१८/प्र.क्र.६९/२-स, दि. १५.०६.२०१८
(२) शासन निर्णय क्र. जिमस.०४१८/६९४/प्र.क्र.६९/का.२-स, दि.२३.०६.२०२२
(३) शासन निर्णय क्र. जिमस.०४२६/प्र.क्र.५०/का.२-स, दि. ०८.०५.२०२६
(४) शासन पुरकपत्र क्र. जिमस.०४३६/प्र.क्र.५०/२-स, दि, २२.०६.२०२६

## प्रस्तावना

राज्यातील शेतकऱ्यांना पीक कर्ज उपलब्ध करुन देण्याकरीता जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची महत्वाची भुमिका आहे. तसेच या बँकांच्या आर्थिक स्थितीवर गाव पातळीवरील विविध कार्यकारी सहकारी संस्थांचे अस्तित्व अवलंबून असते. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांचे कार्यक्षेत्र त्या-त्या जिल्ह्यापुरते मर्यादीत असून या बँकांचे सर्व सभासद त्या जिल्ह्यातील असतात. ही बाब विचारात घेऊन जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या नोकरभरतीमध्ये संबंधित जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे कार्यक्षेत्र असलेल्या जिल्ह्यातील मूळ रहिवासी असलेल्या उमेदवारांना संदर्भाधीन क्र. ३ येथील शासन निर्णयान्वये जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांमधील नोकरभरतीमध्ये स्थानिक उमेदवारांना प्राधान्य देण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे.

दरम्यान, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांच्या ऑनलाईन पदभरती प्रक्रियेतुन चतुर्थश्रेणीतील शिपाई पद वगळण्याबाबत तसेच त्यांना या भरतीमध्ये प्राधान्य देण्याबाबत शासनास निवेदन प्राप्त झाले होते. सदर निवेदनाच्या अनुषंगाने संदर्भाधीन क्र. ४ येथील शासन पुरक पत्रान्वये जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांच्या ऑनलाईन भरती प्रक्रीयेमधुन शिपाई पद वगळण्याबाबत, सदर पदाची शैक्षणिक अर्हता, भरती प्रक्रीयेसाठी परीक्षा पध्दत तसेच या भरती प्रक्रियेमध्ये स्थानिक उमेदवारांना प्राधान्य देण्याबाबत निर्णय घेण्यात आला होता. तथापि, त्यानुषंगाने जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडुन शिपाई पदासाठी घेण्यात येणाऱ्या लेखी परीक्षेच्या गुणांबरोबर मुलाखतीसाठी देखील काही गुण राखुन ठेवण्याची शासनास विनंती करण्यात आली आहे. त्यानुषंगाने संदर्भाधीन क्र. ४ येथील शासन पुरकपत्र अधिक्रमित करुन संदर्भाधीन क्र. १ व २ येथील शासन निर्णयामध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन पुरकपत्र:-

संदर्भाधीन क्र. ४ येथील शासन पुरकपत्र या शासन पुरक पत्रान्वये अधिक्रमित करण्यात येत आहे.

संदर्भाधीन क्र. १ येथील शासन निर्णयातील मुद्या क्र. ३ (iv) नंतर खालीलप्रमाणे मजकूर समाविष्ट करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने चतुर्थश्रेणी संवर्गातील शिपाई पदाची भरती प्रक्रीया राबविताना लेखी परीक्षेकरीता ७० गुण व मौखिक परीक्षेसाठी ३० गुण निश्चित करावे.

संदर्भाधीन क्र. २ येथील शासन निर्णयातील मुद्या क्र.१ मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांच्या ऑनलाईन भरती प्रक्रीयेतुन सुरक्षारक्षक, वाहनचालक, नाबार्डकडील राज्यस्तरीय कार्यबलाच्या अहवालातील प्रकरण ५ मध्ये नमूद वरिष्ठ व्यवस्थापन, मध्य व्यवस्थापन व कनिष्ठ व्यवस्थापनामधील पदे, विशेष / तांत्रिक पदे वगळण्यात आली आहेत. या धर्तीवर चतुर्थ श्रेणीतील शिपाई पद वगळण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

**शैक्षणिक अर्हता:-** जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या शिपाई पदाकरीता किमान शैक्षणिक अर्हता १२ वी उत्तीर्ण अशी राहील.

**भरती प्रक्रीया:-** जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतील चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांच्या नोकरभरती प्रक्रियेत संपूर्ण पारदर्शकता राखली जाणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने बँकेने चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांच्या नोकरभरतीसाठी बँक स्तरावरुन ऑफलाईन पध्दतीने उमेदवारांची लेखी परीक्षा घेणे अनिवार्य राहील. बँकेने अशी परिक्षा अनुभवी व तज्ञ एजन्सीमार्फत घेणे आवश्यक राहील. सदर परीक्षा प्रक्रीयेत कोणताही अनुचित प्रकार घडणार नाही याची बँकेच्या संचालक मंडळाने दक्षता घ्यावी. या परीक्षा प्रक्रियेत कोणताही अनुचित प्रकार घडल्यास बँकेच्या संचालक मंडळावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

तसेच संदर्भाधीन क्र. ३ येथील शासन निर्णयान्वये जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांमधील नोकरभरतीमध्ये स्थानिक उमेदवारांना प्राधान्य देण्याबाबतच्या सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. सदर शासन निर्णयातील मुद्या क्र. १ नंतर खालीलप्रमाणे मजकूर समाविष्ट करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांच्या चतुर्थ श्रेणीतील पदभरतीमध्ये स्थानिक उमेदवारांना १०० टक्के प्राधान्य देण्यात यावे. तथापि, या श्रेणीतील पदभरतीकरीता स्थानिक उमेदवार पुरेशा प्रमाणात उपलब्ध न झाल्यास या जागा जिल्ह्याबाहेरील उमेदवारांमधुन भरता येतील.

२. सदरचे शासन पुरकपत्र महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा सांकेतांक २०२६०७०६१५१९२९६८०२ असा आहे. हे शासन पुरकपत्र डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SANTOSH ARUN PATIL

Digitally signed by SANTOSH ARUN PATIL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=CMTD, 2.5.4.20=CA78467BCC4594E1E11741A7962A7A83FEAFB176442575037160FC343C4AE5AB, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=E52439642AB57C332B2A3E3E46F0D907BA6167409EF6D52C943BF775ECF042FD, cn=SANTOSH ARUN PATIL
Date: 2026.07.06 15:20:18 +05'30'

**( संतोष पाटील )**
**अपर निबंधक तथा सह सचिव,**
**महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

(१) मा. राज्यपाल यांचे सचिव
(२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय,मुंबई.
(३) मा. उपमुख्यमंत्री (नगर विकास) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
(४) मा. उपमुख्यमंत्री (रा.ऊ.शु.) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
(५) मा. मंत्री / मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
(६) मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा / विधानपरिषद, विधानमंडळ सचिवालय, मुंबई
(७) मा. विधानसभा / विधानपरिषद सदस्य (सर्व)
(८) मा. मुख्य सचिव यांचे सह सचिव, मंत्रालय, मुंबई.

(९) अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग

(१०) सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, पुणे.

(११) मुख्य महाप्रबंधक, नाबार्ड, प्रादेशिक कार्यालय, पुणे.

(१२) विभागीय सह निबंधक, सहकारी संस्था (सर्व)

(१३) जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)

(१४) प्रशासक / व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक मर्या., मुंबई.

(१५) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक (सर्व)